अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि. २८ ऑक्टोबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ३० वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## पाकिस्तान स्पर्धेबाहेर; रोमहर्षक सामन्यात आफ्रिकेचा विजय



चेन्नई : चेन्नईतील चेपॉक स्टेडियमवर झालेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं पाकिस्तानचं वर्ल्डकप स्पर्धेतून ऑपरेशन ऑल आऊट नक्की केलं आहे. मधल्या फळीतील एडन मारक्रमच्या झुंजार ९१ धावांच्या खेळीने आफ्रिकेनं पाकिस्तानचा पराभव केला.

या विजयासह दक्षिण गुणतालिकेत प्रथम क्रमांकावर पोहोचली आहे. पाकिस्तानने दिलेल्या २७० धावांचा पाठलाग दक्षिण आफ्रिकेनं सहज पार केला. टॉप ऑर्डर स्वस्तात बाद झाल्यानंतर एडन मारक्रमने खेळपट्टीवर नांगर टाकत संघाचा विजय निश्चित केला. त्याने ९१ धावांची खेळी केली. त्याला उसमा मीरने विजयासाठी २१ धावांची गरज असताना बाद करत रंगत निर्माण केली, पण तबरेज शमसी आणि केशव महाराजने विजय निश्चित केला. आफ्रिकेनं एकवेळ ३३ षटकांत ४ बाद २०६ अशी मजल मारली होती. मात्र, पाकिस्तानने जोरदार कमबॅक करत सामन्यात रंगत निर्माण केली. मारक्रम मैदानात तोपर्यंत आफ्रिकेचा विजय निश्चित समजला जात होता, पण मोहम्मद वासिम ज्युनिअरने त्याला बाद करत पाकिस्तानला सामन्यात परत आणले. ४६ व्या षटकातल शमसी एलबीडब्लू झाला होता, पण रिव्ह्यू आफ्रिकेच्या बाजूनं गेल्याने पाकिस्तानला धक्का बसला.

# चला हवा येऊद्या; लाखो रुपये पाण्यात

## ▪ झेडपीच्या रुपड्यावर प्रशासनाचा आर्थिक 'हातोडा'
## ▪ सजवललेल्या इमारतीवर लाखों रुपयांची उधळपट्टी

सुराज्य/सोलापूर

**एकीकडे लाखो रुपये खर्च करायचे आणि दुसरीकडे ते पाण्यात सोडायची, असा गजब प्रकार सोलापुरातील झेडपी प्रशासनाच्या माध्यमातून घडला आहे. सोलापूर झेडपी प्रशासनाने तीन-चार वर्षांपूर्वी झेडपीच्या इमारतीचे रुपडे पालटण्यासाठी आणि ती सुंदर, खलून दिसावी यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने कोट्यावधी रुपयाचा खर्च करून जिल्हा परिषदेच्या मुख्यालयाची इमारत सजवण्यात आली होती. एक नवे सुंदर दालन दिसावे म्हणून काचेचे आणि रंगीबेरंगी प्लायवूड डिझाईनिंग करून इमारतीला सजावट केली होती. याच सजावटीवर विद्यमान जिल्हा परिषद प्रशासनने या इमारतीवर चला हवा येऊ द्याच्या नावावर चक्क हातोडा टाकला आहे.**





तत्कालीन सीईओ यांनी त्यावेळी झेडपी इमारतीला आयएसआयओ मानांकन मिळावे म्हणून अनेक प्रयत्न केले. आयएसओच्या सर्व त्रुटी पूर्ण करून आयएसओ व नामांकन प्राप्त करून घेतले होते. त्यावेळी जिल्हा परिषद आयएसओ झाल्याचे संपूर्ण जिल्हाभर हे प्रकरण गाजले होते. त्याचाच एक भाग म्हणून या इमारतीचे सुंदरतेचे रुपडे बदलण्यासाठी प्लायवूडने बंद करून घेतला होता. त्यामुळे हा विषय संपूर्ण जिल्हाभर इमारतीची सुंदर असलेली चर्चा हऊन हा विषय संपूर्ण जिल्हाभर गाजला होता. एकीकडे इमारत सजवायची आणि दुसरीकडे डागडुजीच्या नावाखाली ती तोडायची, असे नेमके प्रकार जिल्हा परिषदेमध्ये घडताना दिसून येत आहे. नेमके काय चाललंय हे समजण्या पलिकडे गेलेले आहे.

जिल्हा परिषदेच्या आतील कार्यालयात ही तेवढ्याच प्रमाणात फर्निचरचे काम सुरू आहे. नव्याने सुरु असलेल्या कामांतर्गत इमारतीच्या बाहेरची सर्व काचा फोडून काढली जात आहेत. हा सर्व प्रकार पाहून एक वेगला मेसेज जनतेमध्ये जात आहे. विशेष बाब म्हणजे या इमारतीचे आणि जिल्हा परिषदेच्या आतील कार्यालयाची कामे ही सर्व सेस फंडातून केली जात आहेत . त्यामुळे जनतेच्या हक्काचा जो पैसा आहे, तो या इमारतीच्या बनवलेल्या कामावर आणि आतील कार्यालयातील फर्निचरवर जात आहे. त्याच्यावर लाखो रुपयांची उधळपट्टी कशासाठी केली जात आहे. जिल्हा परिषदेचा आजवरचा अशा प्रकारचे अनुभव आहे, जो नव्याने अधिकारी येतो, तो अधिकारी कार्यालयीन फर्निचर तोडफोड केल्याशिवाय राहतच नाही, हा आजवरचा जिल्हा परिषदेचा इतिहास आहे.

आपण स्वतःच्या घरातले एखादे फर्निचर चे काम केले असता आयुष्यभर तेच फर्निचर आपण वापरतो, मग शासकीय कार्यालयातील फर्निचर दोन-तीन वर्षातच खराब कसे होते हाही प्रश्न उत्तरीय आहे. तसेच खराब झालेले फर्निचर त्याचे ऑडिट केले जाते का, किंवा नव्याने करायचे असेल तर त्याचे ऑडिट घेऊन नव्याने खर्च मंजुरी कशी दिली जाते, हाही प्रश्न गुलदस्त्यातच आहे. खराब झालेल्या कामाचे ऑडिट केले जात नाही व नव्याने काम करत असताना त्याचेही काम ऑडिट होत नाही. त्यामुळे आंधळ दळत कुत्र पीठ खाते अशा प्रकारची परिस्थिती सध्या जिल्हा परिषदमध्ये दिसून येत आहे. शेवटी असेच म्हणावे लागेल चला हवा येऊ द्या च्या नावावर चाललेली तोडफोड थांबेल का किंवा ही योग्य आहे का? असे अनेक प्रश्न सध्या निरुत्तरीत आहेत.



### झेडपी प्रशासनाचा गजब कारभार...

जिल्हा परिषदेची एक वेगळी इमेज निर्माण झाली होती. सर्वसामान्यांचा पाहण्याचा दृष्टिकोनही बदलला होता. कर्मचारी कामावर येताना इमारतीकडे पहातच येत होते. एक वेगळेपणा या इमारतीमध्ये वाटत होते. अशी परिस्थिती असताना जिल्हा परिषद प्रशासनाने त्याच बनवलेल्या डिझाईनवर, काचेवर मागील दोन-तीन दिवसांपूर्वी हातोडा मारण्यास सुरुवात केली आहे. जिल्हा परिषदेच्या आतील काही महत्त्वाचे दालनसुद्धा फर्निचर व्यवस्थित असतानासुद्धा त्या फर्निचरची तोडफोड करून नव्याने फर्निचर बनवण्याचा सपाटा चालू केला आहे.

### आधी खर्च नंतर नुकसान; फर्निचरसाठी लाखोंचा खर्च

मागील एक दीड महिन्यापासून या फर्निचरचे अनेक कार्यालयमध्ये नव्याने फर्निचर बनवण्याचे काम रात्रंदिवस सुरू आहे. त्यामुळे जनतेमध्ये एक उलटा मेसेज जात असून, उलट सुलट चर्चा होत आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्यालयाचे इमारत काचेने रंगवल्यासारखी दिसत होती. त्याचे रुपडे बदललेले सर्वांना हवेसे वाटत होते. मात्र जिल्हा परिषद प्रशासनाने या सर्व प्रकारावर दुर्लक्ष केल्याचे दिसते. खरंच गुदमरल्यासारखे होते काय? असे अनेक प्रश्न समोर येत आहेत. जर अशा प्रकारचे चुकीचे काम झाले असले तर एवढा खर्च करण्याचे काय कारण? त्यावेळच्या सीईओ यांना हे समजले नसावे का? हे समजले नसावे का? असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

## विमा कंपनीच्या प्रतिनिधीसह दोघांची ऑनलाईन फसवणूक; दोघांवर गुन्हा

### एका महिलेचा फोन आला अन् आमिषाला बळी पडले

सुराज्य/सोलापूर




एका महिलेने फोन करून, मी DBS super card visa मधून बोलत आहे, तुम्ही कार्डचा वापर का करत नाही, असे विचारले, तुमचे कार्डची वार्षिक फी जास्त आहे, म्हणून तुमचे कार्ड वापरत नाही, डोके यांनी सांगितले. त्यावर आम्ही तुम्हाला कंपनीकडून सर्व चार्जेस फ्री देत आहोत, असे म्हटल्यावर, तिने दिलेल्या सादेला विमा कंपनीचे प्रतिनिधी डोके यांनी प्रतिसाद दिल्याने, त्यांच्या कार्डवर ९१ हजारांहून अधिक रुपयांची फसवणूक करण्यात आलीय, अशाच पद्धतीने अविनाश नंदकुमार लोंढे यांचीही जवळपास ५१ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आल्याप्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाय.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, न्यु इंडिया इंन्शुरन्स विमा कंपनीचे प्रतिनिधी प्रमोद महादेव डोके (वय -४८, इंदिरा नगर, विजापूर रोड) यांनी DBS super card visa घेतले होते. मात्र त्याचे चार्जेस अधिक असल्याने ते कार्ड वापरत नव्हते. त्याच कार्ड कंपनीकडून बोलतेय, असा एक कॉल ९०४०९२२४२४ या मोबाईल क्रमांकावरुन आला. ती अनोळखी महिला, DBS super card visa संबंधी बोलते यावर विश्वास ठेवून, प्रमोद डोके यांनी तिने विचारलेली सर्व माहिती देत ओटीपी क्रमांक ही दिला.तो कॉल खंडित झाल्यावर काही क्षणात DBS super card visa कंपनीकडून आपल्या क्रेडिट कार्डवर मोठे ट्रांजेक्शन झाले आहे किंवा कसे अशी विचार ना करणारा फोन आला. त्यावेळी प्रमोद डोके यांनी, त्यांना मी कोणतेही ट्रांझेक्शन केले नाही, असे म्हणाल्यावर कंपनीने फिर्यादीस रितसर तक्रार दाखल करण्यास सांगितले. हा प्रकार ०८ जून २०२३ रोजी पहाटे घडला. या संबंधी मोबाईलवर ९१६७४.६९ रूपये कट झाल्याचे मेसेज आले.

अशाच पद्धतीने अविनाश नंदकुमार लोंढे (रा.टिक्केकरवाडी, ता.उत्तर सोलापूर) यांची बजाज फायनान्सचे DBS super card visa क्रेडिट कार्ड हे लाईफ टाईम फ्री चार्जेस करून देतो, असे म्हणून अनोळखी मो. क्र. ८१७१५१५७६२ धारकाने फोन करून लोंढे यांचा विश्वास संपादन करून लोंढे यांच्या मोबाईल क्रमांकावर ओटीपी मेसेज पाठवून ३१ मे २०२३ रोजी ५०,९०० रूपयाची ऑनलाईन फसवणूक केली.याप्रकरणी उपरोक्त क्रमांकाच्या मोबाईल धारकाविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाघचवरे या गुन्ह्याचा तपास करीत आहेत.



सोलापूरः सोलापुरात मराठा समाजाच्यावतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा प्रतिकात्मक पुतळा जाळण्यात आला.

## मराठा क्रांती मोर्चा आक्रमक; मोदींचा पुतळा जाळला

सुराज्य/सोलापूर

राज्यात मराठा आरक्षणाचा प्रश्न तापलेला असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी हे महाराष्ट्रातील शिर्डी या ठिकाणी आले असता त्यांनी मराठा आरक्षणाबद्दल एक शब्द ही काढला नाही, मराठा समाजाविषयी कोणत्याही प्रकारचे गांभीर्य देशाच्या पंतप्रधान यांना नाही, असे दिसून आले. या निषेधार्थ मराठा क्रांती मोर्चाच्यावतीने सोलापुरात पंतप्रधानांचा प्रतिकात्मक पुतळा जाळला.

यापुढे पुतळा न जाळता आमदार आणि खासदार यांच्या गाड्या फोडू आणि त्यांचे कपडे फाडून केंद्र सरकार, राज्य सरकार आणि विरोधी पक्षांनी एकत्र येऊन मराठा समाजाला ५० टक्केच्या आत ओबीसी मधून आरक्षण द्यावे, अन्यथा येणाऱ्या काळात मराठा क्रांती मोर्चाच्यावतीने गनिमी काव्याने आंदोलनाचा दिला. यावेळी भाऊसाहेब रोडगे, निशांत साळवे, प्रकाश जाधव, बाळु बाबर, अक्षय पांडे, मारुती सुरवसे, सुदीप पिंपरे, संभा गळके उपस्थित होते.

## बार्शीत कर सल्लागाराकडून व्यापाऱ्याची १ कोटी ९६ लाख रुपयांची फसवणूक

### ▸ बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

सुराज्य/बार्शी



व्यवसायाचा कर भरण्यासाठी रोख व धनादेश स्वरुपामध्ये विश्वासाने दिलेली १ कोटी ९६ लाख रुपये ७७ हजार रुपये रक्कम स्वतःच्या फायद्यासाठी कर सल्लागाराने ठेवून घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी बार्शी शहर पोलिस ठाण्यात कर सल्लागाराविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. कर सल्लागार नितीन बकाल असे गुन्हा दाखल झालेल्या संशयिताचे नाव आहे. यतीशकुमार बाबूराव गायकवाड (रा.मांगडे चाळ) यांनी फिर्याद दाखल केली. ही घटना १७ नोव्हेंबर २०१८ ते १ जुलै २०२० दरम्यान घडली.

अधिक माहिती अशी की, तुळजापूर रस्त्यावरील होलसेल व्यापारी गायकवाड यांनी कर सल्लागार नितीन उर्फ गणेश बकाल यास व्यवसायासंबंधीत विक्री व खरेदी बीले तपासणे व कर भरण्याचे काम मागील दहा वर्षांपासून करीत होता. सोलापूरच्या तपासणी अधिकारी पथकाने घरी व दुकानी कागदपत्रे पडताळणी व छाननीसाठी भेट दिली होती. त्यावेळी सर्व कागदपत्रे ताब्यात घेतली होती व कर आणि दंड भरावा लागेल असे सांगितले होते. कर आणि दंड भरण्यासाठी बकाल याने ५० लाख, ३० लाख व २० लाख रु असे १ कोटी रुपयांचे तीन धनादेश घेतले. नंतर दोन दिवसांनी बकाल याने कर रोख स्वरुपात भरावा लागेल असे सांगितले. त्यावेळी रोख ३० लाख रुपये घेतले. तुम्ही दहा कोटी रुपये कर व दंड भरावे लागणार होते मी तुमचा कर तपासणी करुन २ कोटी २५ लाख रुपये भरुन सर्व काहीं निरंक केले आहे असे सांगून उर्वरित रक्कम मागितली. माझे उत्पन्न दहा कोटी नाहीं. १० कोटींचा कर व दंड कसा भरावा लागेल अशी विचारणा करुन व्हॅट कार्यालयाकडून कागदपत्रांची मागणी करण्यास सांगितले. त्यावेळी बकाल याने तशी कागदपत्रे मिळत नसतात. तुम्ही उगाच फंद्यात पडू नकात. व्हॅट ऑफिस आपल्यावर नाराज होईल असे म्हणून टाळाटाळ केली. टप्प्याटप्प्याने दोन कोटी २५ लाख रुपये द्या असे सांगितले. एवढा कर दंड होऊ शकत नाही.

एवढी मोठी रक्कम कशी देऊ असे बकालला म्हणताच जर व्हॅट ऑफिस कडून कारवाई झाली तर होणाऱ्या परिणामास तुम्ही जबाबदार असाल असे म्हटल्याने घाबरुन रक्कम देण्यास तयार झालो. बकाल यास १ कोटी ९६ लाख ७७ हजार रुपये देऊन डायरीमध्ये रक्कम देते - घेते वेळी सह्या घेतलेल्या आहेत. २ कोटी २१ लाख ९९ हजार ७८९ रुपये कर भरण्यासाठी दिले होते. त्यापैकी फक्त २५ लाख २२ हजार ७८९ रुपयांचा कर व दंड भरलेल्या चलन पावत्या दिल्या. उर्वरित कर दंड चलनांची मागणी केली तसेच कागदपत्रे देण्यास नकार दिला व गायब केली आहेत असे फिर्यादीत म्हटले आहे. पोलिस निरीक्षक संतोष गिरीगोसावी तपास करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



मंत्रीमंडळ
विस्ताराचीच तयारी !

कल्याण
368-77-278

मुंबई
279-84-266

# सोलापूर जिल्ह्यात ३६ लाख ३३ हजार मतदार

## ▪ ३६ हजार मतदार वाढले; प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

सुराज्य/पुणे

**आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाली आहे. सोलापूर जिल्ह्यात आता ३६ लाख ३३ हजार ७२ मतदार असून त्यामध्ये १८ लाख ८९२३४ पुरुष तर १७ लाख ४३५७९ महीला मतदार आहेत. २५९ इतके तृतीय पंथी मतदार आहेत. घेण्यात आलेल्या नोंदणीमध्ये ३६ हजार ८६६ मतदार वाढले असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.**

दि. २७ ऑक्टो. २०२३ से ९ डिसें.२०२३ या कालावधीत विशेष संक्षिप्त पूर्नरिक्षण कार्यक्रम राबविला जाणार आहे. १ जाने. २०२४ रोजी किंवा त्याआधी १८ वर्ष पूर्ण केलेल्या नागरिकाना या कालावधीत आगाऊ मतदार नोंदणी करता येणार आहे. २०२४ च्या एप्रिल. जुलै, ऑक्टोंबर या महिन्यांच्या १ तारखेला १८ वर्ष पुर्ण होणा-या तरुण तरुणींनाही सदर कालावधीत आगाऊ मतदार नोंदणीसाठी येईल. अर्जावरील प्रक्रीया सदर तिमाहीत पुर्ण करणेत येईल २०२४ मध्ये होऊ घातलेल्या लोकसभा व विधानसभा निवडणूकामध्ये मताधिकार बजाविणेसाठी ही संधी असलेने पात्र नव मतदारांनी नाव नोंदणी करावी, असे कुमार आशीर्वाद यांनी सांगितले.तृतीयपंथी व्यक्ती, शरीर व्यवसाय करणा-या स्त्रीया, भटक्या विमुक्त जमाती यांच्यासाठी २ व ३ डिसेंबर २०२३ रोजी विशेष शिबिरे आयेजित केली जाणार आहेत. ही शिबिरे सामाजिक संस्थाच्या सहकार्याने सदर समाज घटकांना सोईच्या ठिकाणी आयोजित केली जाणार आहेत. या समाजघटकाकडे वास्तव्य आणि जन्म तारखेच्या कागदपत्रांची कमतरता लक्षात घेवून निवडणूक आयोगाने त्यांना स्वयं घोषणपत्राची सवलत दिलेली आहे. त्यामुळे हे समजते आता कोणतेही कागदपत्र नसले तरीही मतदार नोंदणी करू शकणार आहेत.सोलापूर जिल्हामध्ये २७ऑक्टोंबर, २०२३ रोजी एकुण सैनिक मतदार ४,४८१ इतकी आहेत. तसेच, एकुण ३.५६७ इतकी मतदान केंद्रे होती, त्यामध्ये ३२ मतदान केंद्राची वाढ झालेली आहे. एकूण मतदान केंद्र ३,५९९ इतकी झालेली आहेत. जपश्रळपश मतदार नोंदणीसाठी मतदारांनी - voters.eci.gov.in तसेच आपली नावे मतदार यादीमध्ये शोधणेसाठी लशो.ारहरीरोहींर. सीं.ळप या संकेतस्थळाचा वापर करावा मतदार यादी संदर्भात काही माहिती आवश्यक असलेस अथवा काही दुरुस्ती असल्यास संबधित सहा मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी केले आहे.



### मतदारसंघनिहाय वाढीव मतदार असे...

करमाळा २१८८, माढा ३५७२,बार्शी १८२,मोहोळ २४००,शहर उत्तर २७९३, शहरमध्य ३९१८, अक्कलकोट ४१०९, दक्षिण सोलापूर ६२८९, पंढरपुर ४६७५, सांगोला ३३५७, माळशिरस ३३८३

### ३१ ऑक्टोबरला मतदारयादीचे वाचन

३१ ऑक्टोबर रोजी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत शहरी भागातील प्रभागनिहाय मतदारयादीचे वाचन केले जाईल. नव्याने नोंदणीस पात्र असलेले नागरीक, लग्न होऊन परगावी गेलेल्या स्त्रिया, दुबार नावे, मृत व्यक्ती, गावातून कायस्वरुपी स्थलांतरीत झालेले नागरीक अशा नावांचे शोध घेऊन नोंदणी करणे अथवा वगळण्याचा कार्यक्रम घेतला जाणार आहे.